# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
# वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक: 23.04.2024** **वार: मंगळवार**

---

**मतदान जागृती**

पुणे जिल्ह्यातील २१ विधानसभा मतदारसंघांपैकी १३ मतदारसंघात गेल्या लोकसभा निवडणुकीत कमी मतदान झालं होतं. या सर्व ठिकाणी यंदा जिल्हा प्रशासनानं लक्ष केंद्रित केलं आहे. या मतदारसंघातील मतदानाची टक्केवारी वाढवण्यासाठी विविध उपाययोजना केल्या जात आहेत. मतदार जागृतीसाठी; प्रामुख्यानं नवमतदारांनी मतदान करावं यासाठी महाविद्यालयीन पातळीवर प्रयत्न सुरु आहेत. महिला बचत गट, अंगणवाडी कर्मचाऱ्यांचीदेखील या कामी मदत घेतली जात आहे. मेट्रोमधूनही मतदानाचं आवाहन केलं जात आहे.

**पोलीस**

दरम्यान लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर जिल्ह्यातील बंदोबस्तासाठी पुणे ग्रामीण पोलिसांच्या मदतीला केंद्रीय औद्योगिक सुरक्षा दल आणि कर्नाटक पोलिसांचं सशस्त्र दल सज्ज असेल असं पोलिस अधीक्षक पंकज देशमुख यांनी सांगितलं. त्याचबरोबर पुणे लोकसभा मतदारसंघात भाजपा महायुतीचे उमेदवार मुरलीधर मोहोळ यांच्या प्रचारासाठी २९ एप्रिल रोजी पंतप्रधान आणि ज्येष्ठ भाजपा नरेंद्र मोदी यांची सभा होणार आहे. या पार्श्वभूमीवर पुणे पोलिसांकडूनही कडेकोट बंदोबस्त ठेवण्यात येणार आहे.

**हनुमान जन्मोत्सव**

हनुमान जयंतीचा उत्सव आज पुण्यात सर्वत्र अत्यंत उत्साहात साजरा करण्यात आला. विविध हनुमान मंदिरांमध्ये सूर्योदयाच्या मुहूर्तावर पारंपरिक पद्धतीनं हनुमान जन्मोत्सव साजरा झाला. अनेक मारूती मंदिरांत पहाटे जन्माख्यानाची कीर्तनं झाली. विविध मंदिरात दर्शनासाठी भाविकांनी सकाळपासूनच मोठी गर्दी केली होती.

दरम्यान लोकसभा निवडणूकीच्या पार्श्वभूमीवर राजकीय नेते, कार्यकर्ते मारूती मंदिरांना भेटी देऊन नागरिकांशी संवाद साधत आहेत. या निमित्तानं सामाजिक, सांस्कृतिक कार्यक्रमांचंही आयोजन करण्यात आलं आहे.

**होर्डिंग**

वाघोली इथं होर्डिंग पडल्याची घटना घडल्यानंतर पुणे महापालिकेने आता होर्डिंगचे स्ट्रक्चरल ऑडिट करण्याचे आदेश दिले आहेत. स्ट्रक्चरल ऑडिट न करणाऱ्यावर कारवाई करणार असल्याचं अतिरिक्त आयुक्त पृथ्वीराज बी. पी. यांनी म्हटलं आहे.

**औंधनदी**

औंध बाणेर क्षेत्रीय कार्यालय आणि जीवित नदी फाऊंडेशनच्या वतीने औंध परिसरातील राजीव गांधी घाट, मलिंग वाघाचा घाट आणि औंध स्मशानभूमी घाट इथं नुकतंच नदीपात्र स्वच्छता अभियान राबवण्यात आलं. वसुंधरा दिनानिमित्त या उपक्रमाचं आयोजन करण्यात आलं होतं. यावेळी नदीपात्रातून साडेतीनशे किलो कचरा संकलित करण्यात आला.

**ससून**

ससून रूग्णालयाच्या अधीक्षकपदाचा पदभार डॉ. यल्लपा जाधव यांनी स्वीकारला आहे. तत्कालीन वैद्यकीय अधीक्षक डॉ. अजय तावरे  यांच्या जागी डॉ. जाधव यांची नियुक्ती करण्याचे आदेश वैद्यकीय शिक्षण विभागाने दिले होते.

**सजगमंच**

संभाव्य पाणीटंचाई विचारात घेऊन पुणे शहरासाठी ७ पूर्णांक २५ दशलक्ष घनफूट पाणी राखून ठेवण्याचे आदेश जलसंपदा विभागाला द्यावेत, अशी मागणी सजग नागरिक मंचाचे अध्यक्ष विवेक वेलणकर यांनी पालकमंत्री अजित पवार यांच्याकडे केली आहे. पुणे शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या खडकवासला धरण साखळीत सध्या ९ पूर्णांक ४ टीएमसी पाणीसाठा आहे. पुणेकरांची तहान भागवण्यासाठी जुलैपर्यंत सव्वापाच टीएमसी पाणी गरजेचं आहे. बाष्पीभवनामुळे दीड टीएमसी पाणी कमी होण्याची शक्यता असल्याने पुण्याला तीव्र पाणीटंचाईला सामोरं जावं लागणार आहे. या पार्श्वभूमीवर वेलणकर यांनी ही मागणी केली आहे.

**धरण गाळ**

दरम्यान खडकवासला धरणासह पुणे जिल्ह्यातील सर्व धरणांत साठलेला गाळ काढल्यास नागरिकांना कधीही पाणीटंचाई भासणार नाही आणि नवीन धरण बांधण्यासाठी येणारा कोट्यवधी रुपयांचा निधीही वाचेल असं मत तज्ज्ञांनी व्यक्त केलं आहे. खडकवासला धरणाची पाणी साठवण्याची क्षमता सुमारे पावणे चार टीएमसी असली तरी साठलेल्या गाळामुळं ही क्षमता दीड ते दोन टीएमसीने कमी झाली आहे. शहराला किमान एक दीड महिनाभर पुरेल एवढा हा पाणीसाठा आहे. जिल्ह्यातील अन्य धरणाची अवस्थाही काहीशी अशीच आहे. दरवर्षी मार्च ते जून या कालावधीत धरणातील पाणी पातळी सर्वात कमी असते, यावेळी काही सामाजिक संघटना धरणातील गाळ काढतात; जलसंपदा विभागानंही त्यांना मदत करावी अशी अपेक्षा या संघटनांची आहे. गाळ काढला तर पाणी साठवण क्षमता वाढेलच शिवाय शेतीसाठी गाळयुक्त सुपीक मातीदेखील उपलब्ध होईल असं ग्रीन थंब या सामाजिक संघटनेनं म्हटलं आहे. गेली २० वर्ष ही संघटना खडकवासला धरणातील गाळ काढण्याचं काम करत आहे.

**हवामान**

पुणे आणि परिसरात तापमानात पुन्हा वाढ झाली असून आज कमाल तापमान ४० अंश सेल्सिअस नोंदवलं गेलं. उद्या दुपारनंतर आकाश अंशतः ढगाळ राहण्याची शक्यता पुणे वेधशाळेनं वर्तवली आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणेवृत्तांतमध्ये, नमस्कार.**